स्थापना : १९४७

# पाठक ट्रस्ट, मिरज.

ब्राह्मणपुरी, मिरज - ४१६ ४१०. जि. सांगली. (महाराष्ट्र)



**अनाथाश्रम**

**महिलाश्रम**

**वृध्दाश्रम**

## वार्षिक अहवाल
## सन २०१२-१३

www.pathaktrust.org Email : pathakanathashram@gmail.com Ph. : (0233) 2222969, 2222652

स्थापना : १९४७

# पाठक ट्रस्ट मिरज.

## संस्थेचे ट्रस्टी २०१०-११ पासून पुढे

| | |
|---|---|
| डॉ. रा. न. पाठक | अध्यक्ष |
| डॉ. बी. टी. कुरणे | कार्यवाह |
| डॉ. श्री. श्री. कुलकर्णी | सहकार्यवाह |
| श्री. पां. शं. वैद्य | खजिनदार |
| डॉ. सौ. अं. रा. पाठक | विश्वस्त |


## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| डॉ. रा. न. पाठक | अध्यक्ष |
| डॉ. बी. टी. कुरणे | कार्यवाह |
| डॉ. श्री. श्री. कुलकर्णी | सहकार्यवाह |
| श्री. पां. शं. वैद्य | खजिनदार |
| डॉ. सौ. अं. रा. पाठक | विश्वस्त |
| श्री. अ. रा. कोळसे | अधिक्षक |
| श्रीमती सुशिला शेवडे | सदस्य |

## सेवक वर्ग

| | |
|---|---|
| श्रीमती सरोजनी कुलकर्णी | गृहमाता |
| श्रीमती बेबीताई करोले | स्वयंपाकी |
| सौ. सुमन नाईकवडी | आया |
| श्रीमती मंगल जाधव | आया |
| सौ. चिंगुबाई जाधव | आया |
| श्रीमती कल्पना गवळी | आया |
| श्रीमती दिलशाद खतीब | आया |
| श्री. विनायक अष्टेकर | शिपाई |
| सौ. रेश्मा कुलकर्णी | स्वयंपाकी (वृध्दाश्रम) |
| सौ. प्रज्ञा पाठक | स्वयंपाकी (वृध्दाश्रम) |
| सौ. भारती लांडे | मदतनीस |
| सौ. नंदिनी सुर्यवंशी | मदतनीस |

## * संस्थापक *



लोकनेते व माजी आमदार

# कै.डॉ. एन्.आर.पाठक

जन्म दि. ३० सप्टेबर १९१५

मृत्यु दि. ३० नोव्हेंबर १९८५

## * संस्थेचे प्रथम अध्यक्ष *

कार्यकाल : १९६९ ते १९९७



## कै.श्री.बी.आर.तथा भाऊसाहेब पाठक

जन्म दि : २२ जुलै १९१२

मृत्यू दि : १७ मे १९९७

## * माजी अध्यक्ष *

कार्यकाल : १९९७ ते २०११



# कै.श्री.श्री.पळसुले

जन्म : १६ ऑगस्ट १९२८

मृत्यु : १८ मार्च २०११

# स्मरणार्थ देणगी



## कै. शर्मिला श्रीनिवास भट

कै. शर्मिला श्रीनिवास भट मृत्यु दि. १२/०३/१९८१
हिचे स्मरणार्थ श्री. भट यांचेकडून गेली ३२ वर्षे
मुलांचे करिता दररोज ५ लीटर दूधाची देणगी मिळत आहे.
संस्था त्यांची ऋणी आहे.


# श्रध्दांजली

* अहवाल सालामध्ये वृध्दाश्रमातील श्रीमती मिराताई खानोलकर व श्रीमती जयश्री सप्रे या आश्रमवासीयांचे निधन झाले.
* संस्थेचे हितचिंतक श्रीमती सुशिलाबाई गाडगीळ, श्री. रंगनाथ अडिवरेकर, श्री. गोविंदराव पाठक, सौ. सुजाता गाडगीळ, सौ. ललिता लोकूर, डॉ. प्रभाताई गोसावी, डॉ. सौ. माधवी पुजारी, श्रीमती दीक्षित, श्री. जाधव, श्री. गोपाळराव देशपांडे, श्री. अशोक खटावकर (महाराज), श्रीमती कुलकर्णी (सत्तीकर) व श्री. अरविंदराव सावंत यांचेही यावर्षी निधन झाले.

***संस्था या सर्वांना व त्यासह संस्थेचे ज्ञात-अज्ञात हितचिंतक, देणगीदार, सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन झाले त्यांना अत्यंत आदरपूर्वक श्रध्दांजली वाहते.***

**मृतात्म्यास शांती लाभो !**

# भावपूर्ण श्रध्दांजली




## कै. गोपाळराव अमृतराव देशपांडे

(कै. डॉ. एन. आर. पाठक यांचे जावई)

**श्री. गोपाळराव अमृतराव देशपांडे** यांचा जन्म ११.५.१९४६ साली हुबळी येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण हुबळी येथे झाले. त्यांनी डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअरींग ही पदवी धारवाड युनिव्हर्सिटीतून घेतली. सुरुवातीचे काही दिवस कोल्हापूर येथील नामवंत आर्किटेक्ट श्री. बेरी यांचेकडे अनुभव घेऊन श्री. पुंगावकर यांचकडे काम पाहिले. त्यांनी सूतगिरणी, साखर कारखाना अशी कामे पाहिली. १९८९ नंतर १०–१२ वर्षे नॅशनल इंडिया कंपनी मध्ये एक्झिक्युटीव्ह सिव्हील इंजिनिअर म्हणून काम पाहिले. २००३ नंतर निवृत्ती स्वीकारली. दि. ३०/९/२०१३ रोजी त्यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे व मुलगी, जावई दोन नातवंडे असा परिवार आहे. संस्थेच्या उभारणीपासून अखेरपर्यंत त्यांचे सहकार्य व मार्गदर्शन सतत लाभत असे.

# भावपूर्ण श्रध्दांजली



## कै. अशोकराव काशीनाथ खटावकर (महाराज)

पाठक ट्रस्टचे हिंतचिंतक **मा. अशोकरावजी खटावकर (महाराज)** यांचे दि. ७/१०/२०१३ रोजी निधन झाले. सामान्य नागरिकांचे कोणतेही प्रश्न असोत, ते सोडविण्यासाठी त्यांचा पुढाकार होता. मिरजेत गणेशविसर्जन मिरवणूक मार्गावर स्वागत कमानी उभारण्याची प्रथा त्यांनी प्रथम सुरू केली. माजी आमदार कै. डॉ. एन. आर. पाठक यांचे ते कट्टर समर्थक होते.

ते मिरज नगरपालिकेत दोन वेळा तर महापालिकेत एकदा नगरसेवक म्हणून निवडून आले होते. निरनिराळ्या सामाजिक संस्थांशी त्यांची जवळीकता होती. ते मिरज शहर हिंदू एकता संस्थेचे संस्थापक होते. संस्था त्यांना श्रध्दांजली वहात आहे. संस्थेचे माजी ट्रस्टी कै. श्री. काशीनाथपंत खटावकर यांचे ते चिरंजीव होत.

# भावपूर्ण श्रध्दांजली



## कै. अरविंदराव विठ्ठल सावंत (बापू)

पाठक ट्रस्टचे हिंतचिंतक व शनि मारुती मंदिरचे ट्रस्टी **मा. अरविंदराव विठ्ठल सावंत (बापू)** यांचे दि. २५/६/२०13 रोजी निधन झाले. सामान्य कुटुंबात त्यांचा दि. ५/७/१९४५ रोजी जन्म झाला. पुढे एक कामगार (मराठे मिल) म्हणून जीवनाची सुरुवात केली. पण कामगार म्हणून जगणे हे सुरुवातीपासूनच त्यांना पटत नसलेने त्यांनी मंडप डेकोरेटरचा व्यवसाय सुरू केला व अल्पावधीतच तो त्यांनी नावारुपाला आणला. आज 'सावंत बंधू' या नावाने त्यांचा व्यवसाय सुरू आहे. ते सर्वसामान्य, गरीब लोकांची मंगल कार्याची मंडप डेकोरेटर्सची कामे माफक दरात करीत असत.

पाठक ट्रस्ट या संस्थेशी त्यांची जवळीक असल्याने संस्थेची कामेही आपलीच समजून करीत असत. संस्था त्यांना श्रध्दांजली वहात आहे.

# ✻ संस्थेची थोडक्यात माहिती ✻

महोदय,

आपल्या संस्थेचा सन २०१२-१३ सालातील कार्याचा व इतर घडामोडी यांचेवर प्रकाश टाकणाऱ्या अहवालाचा मी आपल्या समोर आढावा घेत आहे. सन १९४७ साली सुरु झालेल्या आपल्या संस्थेला आज ६६ वर्षे पूर्ण होत आहेत.

सुरुवातीच्या काळामध्ये कै.डॉ. न.रा.पाठक यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले होते. अनेक आर्थिक संकटे, त्याचबरोबर जागेचा प्रश्न भेडसावत होता. परंतु त्यांच्या मातोश्री कै. सीताबाई पाठक, बंधू कै. बाळकृष्ण पाठक यांनी सक्रिय पाठिंबा देऊन त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन व मदत केली. मुलांची संख्या कमी होती त्या काळात कै.डॉ.पाठकांनी सर्व मुलांना स्वत:च्या मुलांच्या बरोबरीने घरी वाढविले. जसजसा संस्थेचा व्याप वाढत गेला तशी संस्था पाठक हॉस्पिटल इमारतीच्या एका विभागात सुरु करण्यात आली. हे सर्व होत असताना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून अथवा इतर संस्थाचे मार्फत मिळत नव्हती. कै.डॉ.पाठकांनी स्वत: पदरमोड करुन संस्थेचे कार्य चालू ठेवले. कालांतराने शासकीय मदत मिळण्यासाठी संस्थेचा ट्रस्ट स्थापन करण्यात आला.

१९६९ साली ट्रस्ट स्थापनेनंतर संस्थेत ५० मुले होती. शासनाचे १० बालकांचेसाठी अनुदान मिळू लागले.गेल्या दोन दशकांमध्ये शासनाकडून त्यामध्ये वाढ होऊन ४० बालकांचेसाठी मंजुरी देण्यात आली आहे. शासनाकडून मिळालेले हे अनुदान वाढती महागाई पाहता अगदीच कमी पडते. परंतु काही संस्था, दानशूर व्यक्ती, सामाजिक कायकर्ते यांच्या मदतीने व समाजाच्या सकारात्मक दृष्टीकोनामुळे ती तूट भरुन निघत आहे.

एका अनाथ अर्भकाला सांभाळण्या-पासून सुरु झालेली संस्था आज नवजात अर्भकापासून वृध्द व्यक्तींपर्यंत तसेच निराधार परित्यक्ता स्त्रियांचा आधारस्तंभ बनली आहे. संस्था त्यांचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडवण्याचा प्रयत्न करीत आहे. गेल्या ३ वर्षांपासून संस्थेमध्ये बालकल्याण मंडळ, सांगली यांचे आदेशाने आर्थिक परिस्थितीने गरीब, एक पालक असलेली, ज्यांची काळजी घेणे व ज्यांना संरक्षणाची गरज आहे अशी बालके प्रवेशित होत आहेत.

आज संस्था एकंदर चार विभागात कार्यरत आहे.

१) बालकाश्रम
२) महिलाश्रम
३) वृध्दाश्रम
४) दाई प्रशिक्षण.

**१) बालकाश्रम –**

या विभागात नवजात अर्भकास प्रवेश दिला जातो. तसेच ज्यांचे संरक्षण करुन व काळजी घेण्याची गरज आहे अशा मुलांना बालकल्याण समितीच्या आदेशाने प्रवेश दिला जातो. अहवाल सालामध्ये एकूण ९ मुलांना प्रवेश दिला आहे. त्यामध्ये ५ अर्भके व ४ गरजु मुले–मुली दाखल झाली आहेत. सध्या बालकाश्रमामध्ये एकूण ३७ मुले/मुली आहेत.

**२) महिलाश्रम –**

महिलाश्रम विभागामध्ये कुमारीमाता/विधवामाता/परित्यक्ता महिलांना प्रवेश दिला जातो. त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न संस्थेतील कार्यकर्ते व पदाधिकारी करतात. आजारी गरजू महिलांना औषधोपचार, जेवणखाण व राहण्याची सोय मोफत केली जाते. अहवाल सालात ३ महिलांनी आधार घेतला.

**३) दाई प्रशिक्षण वर्ग –**

महिलाश्रम विभागामध्ये दाखल होणाऱ्या महिलांचे पुनर्वसनासाठी व समाजातील स्वतःच्या पायावर उभ्या राहू इच्छिणाऱ्या महिलांना प्रशिक्षण देऊन कै.डॉ.न.रा.पाठकांनी दाईप्रशिक्षण वर्ग सुरु केला. प्रशिक्षण विनामूल्य आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या व 10 वी पास असलेल्या कोणत्याही महिलेस प्रवेश दिला जातो. सहा महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर 'मुंबई माता बाल संगोपन संघटना' या संस्थेमार्फत त्याची परीक्षा घेतली जाते. उत्तीर्ण होणाऱ्या मुलींना सिनिअर दाईचे प्रमाणपत्र मिळते. त्या सरकारी अथवा खाजगी हॉस्पिटलमध्ये नोकरी करू शकतात. तसेच स्वतःचे पायावर उभ्या राहू शकतात व संसारास आर्थिक हातभार लावू शकतात.

**४) वृध्दाश्रम –**

वृध्दाश्रम ही काळाजी गरज आहे. हे कै. डॉ.न.रा.पाठक यांनी ओळखले होते. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्नही केले. परंतू त्यांचे स्वप्न साकार होण्यापूर्वी त्यांना देवाज्ञा झाल्याने त्यांचा संकल्प पूर्ण करण्याचा निश्चय त्यांचे बंधू कै.श्री.बा.रा.पाठक व चिरंजीव डॉ.रा.न उर्फ मुकुंदराव पाठक यांनी केला. हा वृध्दाश्रम १९९0 साली सुरु झाला.

या विभागात वयाची ६0 वर्षे पूर्ण करणारी कोणतीही व्यक्ती प्रवेश घेऊ शकते. आज या संस्थेत १६ स्त्रिया व ९ पुरुष असे एकूण २५ वृध्द आहेत. अहवाल सालात १ महिला वृध्दास नव्याने प्रवेश देण्यात आला आहे. अहवाल सालात श्रीमती मिरा खानोलकर व श्रीमती जयश्री सप्रे यांचे निधन झाले.

**– कार्यवाह : डॉ.बी.टी.कुरणे**
**– सहकार्यवाह : डॉ. श्री. श्री. कुलकर्णी**

## अहवाल सालामधील घडामोडींचा थोडक्यात आढावा

बालकाश्रम विभागातून २ मुले दत्तक देण्यात आली. त्यांचे न्यायालयामार्फत कायदेशीर पध्दतीने कामकाज सुरु आहे. समाजातील मुलगा व मुलगी हा भेदभाव दूर होत आहे. संस्थेला मुले दत्तक देण्यासाठी शासकीय मान्यता मिळाली आहे. या मुलांना दत्तक देऊन त्यांना हक्काचे घर व आई–वडिल मिळाले आहेत.

वृध्दाश्रम विभागात एका वृध्दास नव्याने प्रवेश दिला आहे.

संस्थेच्या कार्याचा आढावा घेत असताना काही संस्था, मंडळे, कार्यकर्ते, दानशूर व्यक्ती यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. हे सर्व लोक संस्थेचे आधारस्तंभ आहेत. ह्यामध्ये श्री. श्रीनिवासराव भट, श्रीमती धोत्रे, सौ. व श्री. गणेश फाटक (अमेरिका) फ्लोरिडा महाराष्ट्र फाऊंडेशन, इनरव्हील क्लब, रोटरी क्लब, श्री. भरतभाई कानानी, चि. सुजय बाडगे व श्री. विवेक वैद्य या सर्वांचा उल्लेख करणे प्रामुख्याने गरजेचे आहे. वृध्दांची वैद्यकीय तपासणी करणेसाठी डॉ. श्रीकांत कुलकर्णी व श्री. रामकृष्ण श्रीपाद गाडगीळ हे दर शनिवारी संस्थेत येतात, तर बालकांचे करीता डॉ. संतोष कुलकर्णी व डॉ. सौ. मंजुश्री कुलकर्णी हे लहान बालकांची आरोग्याची तपासणी करुन औषधोपचार करत आहेत. वृध्दाश्रमात श्री. प्रभाकर केळकर रोज योगासन वर्ग घेतात. श्री. हरजितसिंग खंगुरा यांचेही संस्थेस सहकार्य लाभते. तसेच मा. पोलीस अधिक्षक सांगली व मिरज व या परिसरातील दानशूर नागरिक या सर्वांचे संस्थेच्या वतीने आभार मानतो.

अहवाल सालात जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, श्री. एस्. बी. मोहीते, सांगली यांनी व त्यांचे सहकारी वेळोवेळी संस्थेस भेटी देऊन संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले व योग्य त्या मार्गदर्शक सूचना केल्या. तसेच बाल कल्याण समिती अध्यक्ष श्री. गौतम प्रज्ञासूर्य व त्यांचे इतर सहकारी सदस्य यांनीही संस्थेस भेट दिली व समाधान व्यक्त केले. त्यांचेही सहकार्य नेहमी मिळते.

### * मुलांचे संगोपन *

संस्थेमध्ये मूल दाखल झाल्यावर त्याची पूर्ण वैद्यकीय तपासणी २४ तासाचे आत केली जाते. त्याच्यावर योग्य ते औषधोपचार केले जातात. त्याच्या शारिरीक व मानसिक वाढीकडे बारकाईने लक्ष ठेऊन त्याचे संगोपन केले जाते. अहवाल सालात संस्थेमध्ये ९ बालके दाखल झाली व बालकल्याण समिती सांगली यांचे मार्फत ९ मुले प्रवेशित झाली आहेत.

लहान बाळांची निगा करणे हे जोखमीचे काम असते. ती व्यवस्थित होण्यासाठी संस्थेने इनक्युबेटर (काचेची पेटी) व वॉर्मर अशी दोन वैद्यकीय उपकरणांची सोय केली आहे. कमी वजनाच्या बाळांची वाढ योग्य दिशेने होण्यासाठी त्यांना सकस आहार दिला जातो. दररोज सकाळी दूध व नाष्टा दिला जातो. त्यामध्ये ऋतुमानानूसार उपलब्ध असलेली फळे, शिरा,

उप्पीट, पोहे इ. पदार्थ दिले जातात. जेवणामध्ये पोळी, भाजी, वरण–भात, आमटी इत्यादी पदार्थ दिले जातात. सणाच्या दिवशी गोड जेवण तसेच ठेव देणगीच्या रकमेतून गोड जेवण दिले जाते. श्रीखंड, आम्रखंड, बासुंदी, गुलाबजाम, इ. मिष्टान्न दिले जाते. रुचीपालट म्हणून मुलांना भेळपुरी, आईस्क्रीम, पाव–भाजी, बटाटेवडे व दहीवडे, मिसळ इ. दिले जाते.

## मुलांचे दैनंदिन कार्यक्रम

*** मुलाचे दैनंदिन कार्यक्रम –**

मुले दररोज सकाळी ६.०० वाजता उठतात. ६.३० वाजेपर्यंत सर्व आटोपून ७ वाजता प्रार्थना व व्यायाम घेतला जातो. नंतर दूध व नाष्टा घेऊन मुले शाळेत जातात. सकाळी ११.३० ते १२.३० वाजता जेवण होते. दुपारी अभ्यास घेतला जातो. सायं. ५ वाजता दूध व नाष्टा दिल्यावर मुले भानू तालीम व वृध्दाश्रमाच्या योगासन वर्गात व्यायामासाठी व योगासनासाठी जातात. ७ वाजता सायंकालीन प्रार्थना होते. नंतर मुलांना करमणुकीचे कार्यक्रम दूरचित्रवाणीवर दाखविले जातात. ८ वाजता जेवण दिले जाते. ९ ते १० वेळेत मुले शाळेचा गृहपाठ करतात. १० वाजता झोपी जातात.

*** शैक्षणिक उपक्रम –**

इ. १ ली ते इ. ७ वी पर्यंतचे विद्यार्थी भारतभूषण, बाल शिक्षण व आदर्श शिक्षण संस्था, मिरज येथे तर ८ वी ते १० वी पर्यंतचे विद्यार्थी विद्यामंदिर प्रशाला, मिरज येथे प्रवेशित आहेत.

अहवाल सालातील शैक्षणिक निकाल १००% लागला आहे. मुला–मुलींना संगणक शिक्षणाचे प्रशिक्षण मिळावे व त्यांना आधिक ज्ञान प्राप्त व्हावे या दृष्टीने श्रीमती कुलकर्णी मुलांना संगणकाचे मार्गदर्शन करतात. संस्था मुलांच्या सामान्यज्ञानात भर पडावी म्हणून सातत्याने प्रयत्नशील आहे.

## अहवाल सालातील शालेय तक्ता

| | बाल वाडी | १ली | २री | ३री | ४थी | ५वी | ६वी | ७वी | ८वी | ९वी | १०वी | कॉलेज | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुले | १ | – | २ | – | – | १ | २ | १ | – | – | ३ | – | १० |
| मुली | ३ | – | ५ | १ | १ | ३ | २ | २ | – | २ | – | – | १९ |

पाळणा घरात ०७ + २९

एकूण ३६

**⁕ सण समारंभ –**

संस्थेमध्ये सर्व राष्ट्रीय व धार्मिक सण साजरे केले जातात. चालू वर्षी २६ जानेवारी हा राष्ट्रीय सण डॉ. अभिजीत द. जोशी व डॉ. सौ. सुवर्णा जोशी (विश्रामबाग) यांचे हस्ते ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला.


१५ ऑगस्ट ध्वजारोहणचा कार्यक्रम श्री. दिलीप आपटे (अध्यक्ष, गीता फाऊंडेशन), मिरज यांचे शुभहस्ते साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास सर्व पदाधिकारी, मुले व वृध्द तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

धार्मिक कार्यक्रमामध्ये रक्षाबंधन, गणेशोत्सव, दसरा, कोजागिरी पौर्णिमा, दिवाळी, रंगपंचमी या सारख्या सणांचा आनंद मुलांनी उपभोगला. त्यांना दिवाळीमध्ये नवीन कपडे, सुगंधी तेल, साबण, उटणे, फटाके, पुरवून त्यांचा आनंद द्विगुणीत करण्यात आला. त्याचबरोबर फराळाचे पदार्थ पुरविण्यात आले. तर चालू दसरा व दिवाळी सणा करिता मागील वर्षी प्रमाणे या ही वर्षी श्री. भरतभाई कानानी, यांचे तर्फे नवीन ड्रेस व सौंदर्यप्रसाधने वाटप केले. श्री. विश्वनाथ कुलकर्णी (पुणे), श्रीमती गायकवाड, श्री. डोणगे परिवार आणि गुजर बंधू (ज्ञानदीप वस्त्रनिकेतन) व रविंद्र रेडिमेड यांनी मुलांसाठी दिपावलीनिमित्त नवीन कपडे घेतले. तसेच यावर्षी जून महिन्यात श्री. दुलाणी, कोल्हापूर यांनी मुलांना शालेय साहित्य व गणवेश दिले.

**⁕ सांस्कृतिक कार्यक्रम –**

संस्थेतील मुलांना शालेय शिक्षणाबरोबर सामान्यज्ञान, सुसंस्कार, इ. गोष्टी समजाव्यात या करिता करमणुकीद्वारे मनोरंजनाबरोबरच संस्कारक्षम कार्यक्रम केले जातात. मुलांच्या सुप्त गुणांना उत्तेजन मिळावे यासाठी गणेशोत्सव, बालदिन, शिवजयंती, गांधी जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असे विविध कार्यक्रम सादर केले जातात. मुलांच्या करमणुकीसाठी संस्थेने रंगीत टिव्ही घेतला असून निरनिराळे कार्यक्रम त्यांना दाखविले जातात. मुलांचे करिता छोटी छोटी गोष्टीची पुस्तके व दैनिक वर्तमानपत्रे यांचीही सोय केली आहे. सर्व प्रकारचे खेळ साहित्य ही पुरविले आहे.

## WORLD WIDE WEB - PATHAK TRUST GOES GLOBAL




पाठक ट्रस्टची www.pathaktrust.org ही वेबसाईट माहितीसाठी उपलब्ध केली आहे. त्यावर संस्थेचा परिचय, इतिहास, कार्याची माहिती मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमातून देण्यात आली आहे. याचा विशेषकरुन परदेशी राहणाऱ्या व दूरस्थ लोकांना ट्रस्टची माहिती घेण्यासाठी व ट्रस्टशी e-mail pathakanathashram@gmail.com वर संपर्क साधण्यासाठी फायदा होईल. तसेच संस्थेचे जुने अहवाल आता Digital स्वरुपात उपलब्ध होतील. यासाठी डॉ. सुधन्वा रामचंद्र पाठक यांचे सहकार्य लाभले.

## दत्तकासाठी लागणारी न्यायालयीन कागदपत्रे

१. संस्थेचा मूल–मागणी अर्ज (विहित नमुन्यात भरलेला).
२. दत्तकेच्छु पालकांचे वयाचे दाखले, जन्माचे दाखले अथवा कागदपत्रे.
उदा. एस.एस.सी. प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला.
३. विवाहाचे प्रमाणपत्र.
४. दत्तकेच्छु पालकांचे फोटो.
५. वैद्यकिय अहवाल दोघांचाही (संस्थेचे नमुन्याप्रमाणे), एच.आय.व्ही. रिपोर्टसहित.
६. मूल होत नसले संबंधी स्त्री रोग तज्ञ डॉक्टरांचे (गायनाकॉलॉजीस्ट) चे प्रमाणपत्र.
७. मिळकतीचा दाखला.
८. नोकरीचा अथवा उत्पन्नाचा दाखला किंवा प्राप्तीकराचे सर्टिफिकेट.
९. बँकेचे संदर्भ पत्र व मालमत्ता संबंधीचे कागदपत्रे.
१०. पत्नीचे संमतीपत्र.
११. पतीचे संमतीपत्र.
१२. दत्तक घेणाऱ्यांच्या पालकांचे संमतीपत्र.
१३. जर दोघेही नोकरीत असतील तर मूल सांभाळ करणेसाठी केलेल्या व्यवस्थेचे बॉण्ड पेपरवर हमीपत्र.
१४. ओळखपत्रे / शिफारस पत्रे तीन व्यक्तींकडून नाव, पत्ता फोन नंबर सहीत.
१५. दत्तक घेणाऱ्यांचेपेक्षा वयाने लहान असलेल्या नातेवाईकांचे रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले हमीपत्र.
१६. पोलिसांचा राहते ठिकाणाशी संबंधित पोलीस ठाण्याकडून वर्तणुकीचा दाखला.
१७. मुलाची प्रगती वेळोवेळी कळविण्यासंदर्भात स्टॅम्प पेपर हमीपत्र.
१८. गृहभेट चौकशी अहवाल.

टिप : १) दत्तक घेणाऱ्या पती–पत्नी यांची वयाची बेरीज ८५ पेक्षा जास्त असू नये.
२) पती व पत्नी यांचे मासिक उत्पन्न कमीत कमी रु. १५,०००/– असणे आवश्यक आहे.

## सध्या कार्यरत असलेल्या उपक्रमांमध्ये आपण खालीलप्रमाणे मदत करू शकता.

१. रोख स्वरुपात व वस्तूरुपाने – धान्य, कापड/कपडे, दूध, फळे, कोरडे धान्य पदार्थ, पुस्तके, गणवेश, छत्र्या, फर्निचर, कॉम्प्युटर, खेळणी, शालेय साहित्य, चप्पल/बूट, स्वेटर, ब्लँकेट, रग, रेनकोट, इत्यादी देणगी रुपाने.

२. रोज ठराविक वेळ किंवा आठवड्यातून एकदा संस्थेत येऊन मुलांना संस्कार, गाणी, विविध कला शिकविणे.

३. मुलांचा शैक्षणिक खर्च, वृध्दांचा नियमित, मासिक, औषधोपचाराचा खर्च, नियमित मासिक देणगी, वार्षिक वर्गणी, ठेवीवरील व्याज रुपात.

४. मुलांना दत्तक घेऊन.

५. आपल्या आई–वडिलांच्या स्मृति प्रित्यर्थ कायम ठेव योजनेत ठेव ठेवून व्याजाचा विनियोग इच्छेनुरुप मुलांना खाऊ, पुस्तके, शालेय गणवेश इत्यादीसाठी वापर करता येतो.

६. संस्थेच्या इमारत निधीस मदत.

७. स्वत: मदत करा व इतरांना तसे करण्यासाठी प्रवृत्त करा.

८. संस्थेच्या मुला–मुली बरोबर लग्न करणे, लग्नास मदत करणे व त्यांना नोकरी मिळवून देऊन स्वावलंबी करणे अशा प्रकारे आपण मोलाची मदत करु शकता.

# कै. डॉ. न. रा. पाठक यांचा २७ वा स्मृतीदिन ३० नोव्हेंबर २०१२

३० नोव्हेंबर २०१२ कै. डॉ. न. रा. पाठक यांचा २७ वा स्मृतीदिन विविध कार्यक्रमांनी संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी पुतळ्यास अभिवादन करुन झाली. या कार्यक्रमास संस्थेमधील प्रवेशीत व डॉक्टरांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर पाठक हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. दुपारी वधु–वर मेळावा आयोजित करण्यात आला.

सायंकाळी मुक्तांगण मिरज येथे कै. डॉ. न. रा. पाठक यांचेवर प्रेम करणाऱ्या नागरिकांच्या उपस्थितीत स्मृतीदिनाचा कार्यक्रम साजरा झाला. प्रमुख पाहुणे श्री. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते प्रतिमा– पूजन करण्यात आले.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सुरुवातीस संस्थेचे कार्यवाह डॉ. कुरणे यांनी अहवाल वाचन केले. त्यानंतर प्रबोधनपर 'मुसाफीर – माझा लेखन प्रवास' या विषयावर झालेल्या भाषणामध्ये श्री. अच्युत गोडबोले यांनी कै. डॉ. पाठक यांच्या समाजकार्याचा गौरव केला. ते म्हणाले, ''अनाथ आश्रम व वृध्दाश्रम दोन्ही संस्था बघून आनंद झाला.'' नंतर त्यांनी त्यांच्या गाजलेल्या पुस्तकांचा उल्लेख केला. मुसाफीर या गाजलेल्या पुस्तकांमधून जीवनाचे चढउतार पाहिले. बोर्डरुम, नादवेध, किमयागार, तसेच 'मनांतले' ह्या मानसशास्त्रांवरील पुस्तकात लहान मुले शिकतात कशी ? भिती केंव्हा वाटते ? रंग कसे ओळखतात ? इ. चे वर्णन आहे. श्री. गोडबोले यांनी अनेक वर्षे कॉम्प्युटर सॉफ्टवेअर क्षेत्रात काम केले असून अनेक वेळा परदेशवाऱ्या केल्या आहेत. तसेच त्यांनी आदिवासी क्षेत्रांतही काम केले आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. एस. एम. नाटेकर यांनी संस्थेच्या चालू कार्याचा गौरव केला. कै. डॉ. पाठक यांनी राजकारण करून समाजसेवा केली, तसेच ही लाखमोलाची समाजसेवा कोटींच्यापर्यंत नेण्याची किमया त्यांचे सुपुत्र डॉ. मुकुंद पाठक यांनी केली असा उल्लेख केला.

सदर समारंभास श्री. बापूसाहेब पुजारी (कुटुंबप्रमुख, सांगली अर्बन को–ऑप. बँक, सांगली) व संस्थेचे इतर पदाधिकारी, नागरिक हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीकांत कुलकर्णी व श्री. अशोक तुळपुळे यांनी केले.

शेवटी संस्थेचे अधिक्षक श्री. कोळसे यांनी प्रमुख पाहुणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष व सर्व उपस्थितांचे आभार मानले व चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## अहवाल सालात संस्थेस भेट देणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचे अभिप्राय

दि. १५/११/२०१२

*आज दि. १५/११/२०१२ रोजी पाठक अनाथआश्रम मिरज येथे प्रांत ऑफीस व तहसिल कार्यालय मिरज यांचे वतीने भेट दिली व मुलांना खाऊ वाटप व भेट वस्तू दिल्या. अनाथ आश्रमाचे कार्य चांगले व स्तुत्य स्वरुपाचे आहे. आम्ही डॉ. पाठक यांचे आभारी आहोत व त्यांना शुभेच्छा.*

**– मा. श्री. टी. पी. दोरकर**
महसूल नायब तहसिलदार,
मिरज.

दि. १६/११/२०१२

*आज रोजी पाठक अनाथाश्रमाला भेट देण्याचा योग आला. हे काम पाहून मी तरी भाराऊन गेलो. माणसाच्या जीवनातील हे अत्त्युच्च काम आहे. मानवजातीबद्दल पराकोटीची भावना ठेऊन एक आदर्शवत काम चालू आहे. यापेक्षा उच्च उद्दीष्ट असूच शकत नाही.*

*या संस्थेच्या चालकांना कृतज्ञतापूर्वक धन्यवाद. या संस्थेस बळकटी येवो.*

**– मा. श्री. अजितराव घोरपडे (सरकार)**
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य.

दि. ३०/११/२०१२

*पाठक अनाथाश्रम बघून चकित झालो. येथील मुले शिस्तीत बसली होती. स्वैंपाकघर खूपच स्वच्छ होतं. एकूण डॉ. पाठकांचे dedication खूपच great वाटलं.*

*या अनाथाश्रमाला माझ्या खूप खूप शुभेच्छा.*

**– मा. श्री. अच्युतराव गोडबोले**

दि. ३०/११/२०१२

*एके काळी समाजातील रुढीप्रमाणे अनाथ मुले-मुली, विधवा स्त्रिया यांचे प्रमाण मोठे होते आणि त्यांना घरातून बाहेर काढले त्यांना घर, प्रेम, वात्सल्य, स्नेह देऊन, आपल्या पायावर उभे करणे जरुरीचे होते. ती गरज खरं म्हणजे हळूहळू कमी होणे अपेक्षित होते. पण काळाप्रमाणे नवीन प्रश्न उभे आहेत आणि त्यामुळे अनाथाश्रम, अर्भकालय आणि वृध्दाश्रम ह्या तीनही संस्थांची नितांत गरज दुर्दैवाने भासत आहे. ह्या अतिशय अवघड आव्हानात्मक कार्याची धुरा डॉ. मुकुंद पाठक, त्यांचे कुटुंबीय, मित्रमंडळी, हितचिंतक, त्याच संस्थांतून जीवन उभे करणारे लाभधारक आणि सर्वात महत्वाचे - नोकरीपेक्षा एक सेवा म्हणून काम करणारा नोकरवर्ग त्यांनी सर्वांनी सांभाळलेले कार्य प्रत्यक्ष बघून जे समाधान, कृतकृत्यता आणि आनंद झाला ते शब्दात मांडणे केवळ अशक्य आहे. ह्या एका मोठ्या व सदैव वाढणाऱ्या कुटुंबाला आम्हा दोघांचे मनःपूर्वक धन्यवाद आणि शुभेच्छा.*

**– डॉ. श्रीनिवास नाटेकर,**
**– सौ. माधवी नाटेकर**
सांगली.

दि. २१/१२/२०१२

*आज रोजी पाठक ट्रस्ट संचलीत पाठक बालगृहास दत्तक परवाना नुतनीकरणाचे अनुषंगाने भेट दिली असता अधिक्षक श्री. कोळसे पाटील व इतर कर्मचारी उपस्थित होते. प्रवेशिका पटावर ३३ असून सर्व प्रवेशित हजर आहेत.*

*सविस्तर अहवाल सादर करण्यात येईल.*

**– श्री. व्ही. एन. चौगुले** प.अ.जि.म.बा.
**श्री. एस. डी. मोहिते** जि.म.बा.वि.अधिकारी

दि. २९/१/२०१३

*आज रोजी आमचे नेते मा. जगन्नाथरावजी शिंदे उर्फ आप्पा यांच्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त या अनाथ आश्रमातील बालकांना फळे वाटप करताना आम्हांस खूप आनंद झाला. सर्वच मुलांनी या प्रसंगी मा. आप्पांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.*

**– मिरज शहरातील सर्व केमिस्ट बांधव.**

दि. २१/२/२०१३

*आज रोजी पाठक अनाथाश्रमास सन २०११-१२ चे तपासणीकरिता** भेट दिली असता अधिक्षक श्री. पाटील व इतर कर्मचारी उपस्थित होते. तपासणी कामी सर्व रेकॉर्ड उपलब्ध करून दिले.*

*सविस्तर अहवाल सादर करण्यात येईल.*

**– श्री. व्ही. एस. चौगुले**
परिशिक्षा अधिकारी,
महिला बाल कल्याण कार्यक्रम

दि. २४/२/२०१३

*आज रविवार दि. २४ फेब्रुवारी २०१३ रोजी सकाळी ११ ते १२.३० पर्यंत अनाथ बालकाश्रमास आमच्या विद्यार्थ्यांसह भेट दिली. येथील कर्मचाऱ्यांनी चांगले स्वागत केले. येथील स्वच्छता व आस्था पाहून आनंद वाटला. येथील मुलांनी गाणी, नृत्य सादर केले ते पाहून खूप मजा आली. आपले कार्य खरोखरीच वाखाणण्यासारखे आहे.*

*आपल्याला पुढील कार्यास शुभेच्छा.*

**– डॉ. व्ही. आर. जंबगी**
**– डॉ. राहूल नाकील**
**– डॉ. सौ. गौरी मुळीक**
लोकनेते राजारामबापू पाटील आयुर्वेदिक
मेडिकल कॉलेज, इस्लामपूर.

दि. ४/३/२०१३

*आज पाठक ट्रस्टला भेट दिली. डॉ. पाठक यांनी वेळात वेळ काढून अनाथआश्रमाची माहिती दिली. त्यांचे हे अनमोल असे कार्य पाहून आपण जी मदत करतो ती फार खुजी/छोटी आहे अशी भावना निर्माण झाली. त्यांच्या या कार्यासाठी त्यांचे शतषः आभार.*

**– श्रीमती मिताली मोराणकर**
महाराष्ट्र मंडळ, अबुधाबी.

दि. ७/३/२०१३

*पाठक ट्रस्टच्या बालकाश्रमाला भेट दिली व सर्व व्यवस्था पाहून खूपच समाधान वाटले. येथील व्यवस्थापक श्री. अशोकजी कोळसे यांनी दिलेल्या सर्व माहितीमुळे येथे सुरू असलेल्या कार्याची माहिती मिळाली.*

*आपल्या कार्यास शुभेच्छा.*

**– श्री. निनाद देसाई**
सरव्यवस्थापक, लोकमत वृत्तपत्र.

दि. १२/४/२०१३

*आज रोजी संस्थेत नविन प्रवेशित बाळास (अश्विन) भेट देण्यास आले असता गृहमाता श्रीमती कुलकर्णी, काळजीवाहक व संस्थेचे अधिक्षक उपस्थित होते. सदर बाळास मिरज रेल्वे पोलीसांनी संस्थेत आणले होते. बाळास रेल्वे डब्यात खोक्यात ठेवण्यात आले होते. या बाळास काळजी व संरक्षणासाठी या बालगृहात दाखल करण्यात आले आहे. त्याची ताबडतोब वैद्यकीय तपासणी करून घेणेत आल्याचे समजले. बाळास कोणतीही इजा व दुखापत नसल्याचे दिसून आले. बाळास सर्व सुविधा व वैद्यकीय उपचार देण्याबाबतच्या सूचना करण्यात आल्या. संस्थेतील इतर मुलांचीही माहिती घेतली. त्यांच्या परिक्षा १७ ता. ला संपणार असल्याचे समजले. बाळाच्या पालकांचा शोध घेण्यासाठी कायदेशीर उपाय करण्याच्या सूचना करण्यात आल्या.*

**– सौ. हेमलता कदम**
अध्यक्षा, बालकल्याण समिती

**– श्री. चंद्रकांत खंडागळे**
सदस्य, बालकल्याण समिती

दि. १४/४/२०१३

*रोटरी क्लब ऑफ सांगली मिडटाऊनचे वतीने मुलांसाठी दप्तर, तेल-साबण देणेत आले. व्यवस्था उत्तम तसेच स्वच्छता दिसून आली. या संस्थेला जेवढी मदत करणे शक्य आहे तेवढे करत राहू.*

**– श्री. अशोक कोठावळे**
अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ सांगली

दि. २०/४/२०१३

*आज जालिंदर हुलवान यांचे मुलीचा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्ताने भेट दिली.*

*समाजातील अनाथ मुलांना असलेला हा आधारस्तंभ. निस्वार्थीपणे व समाजाचे कल्याणाकरिता काम करणारी माणसे येथे पहावयास मिळाली.*

*मी संपूर्ण पोलीस दलातर्फे या संस्थेस व संस्था चालकांना हार्दिक शुभेच्छा देतो.*

**– मा. श्री. दिलीप सावंत**
पोलीस अधिक्षक, सांगली.

दि. २९/५/२०१३

*आज रोजी पाठक अनाथालयास अचानक भेट देऊन तपासणी केली असता भेटीवेळी अधिक्षक श्री. कोळसे पाटील व इतर कर्मचारी उपस्थित होते. प्रवेशिका पटावर ३७ असून प्रत्यक्ष उपस्थित २५ असून १२ रजेवर आहेत. तपासणीकामी सर्व रेकॉर्ड आम्हाला हजर करून दिले.*

*सविस्तर अहवाल सादर करण्यात येईल.*

**– श्री. व्ही. एन. चौगुले**    **श्री. ई. एम. बारदेसकर**    **श्री. ए. बी. पाटील**
प.अ.जि.म.बा.    जि.म.बा.वि.अधिकारी    जि.म.बा.वि.अधिकारी

दि. १५/८/२०१३

*१५ ऑगस्ट १३ स्वातंत्र्यदिनानिमित्त आज भेट दिली. वातावरण खूप कौटुंबिक आहे. हे पाहून खूप आनंद झाला. लहान मुलांचा उत्साह खूप छान होता.*

*सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.*

**– श्री. दिलीप आपटे**
गीता फाऊंडेशन

दि. १/९/२०१३

*आज रोजी केंद्रीय मंत्री प्रतिकदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त फळवाटप कार्यक्रम केला.*

*येथील सर्व मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून समाधान वाटले. त्यांचे आरोग्य, जेवण व राहणीमान उच्च प्रतिचे आहे.*

**– प्रा. सिध्दार्थ जाधव,** मिरज.

१४/११/२०१३

*श्री पाठक ट्रस्टच्या आश्रमास आज भेट देण्यासाठी आलो असता एका मोठ्या कुटुंबास भेटत आहे अशीच भावना मनात आली. सर्व कुटुंबातील सदस्यांची काळजी मायेने घेणाऱ्या पाठक आश्रमास मनापासून शुभेच्छा !*

**– श्री. सतिश अडके**

दिवाणी न्यायाधीश, मिरज.

२५/११/२०१३

*माझे स्नेही प्रभात हेटकाळे यांचे माध्यमातून आज मिरज येथील सामाजिक संस्था श्री. पाठक ट्रस्ट येथे भेट देण्याचा योग आला. समाजातील जन्मदात्यांनी नाकारलेली व समाजाने नाकारून सोडलेली मुले यांचे अत्यंत काळजीपूर्वक संगोपन येथे केले जाते हे पाहून मन अगदी हेलावून गेले. सावित्रीबाई फुले आणि डॉ. आंबेडकर यांचा वारसा जोपासण्याचे सत्कार्य आजही सुरू आहे याचा आनंद झाला. यापुढील ट्रस्टच्या वाटचालीसाठी लाख लाख शुभेच्छा !*

**– श्री. सुरेश दादोबा चौगुले**

निरीक्षक, स्टेट एक्साईज, मिरज.

२५/११/२०१३

*कै. मोहनरावजी शिंदे यांच्या २० व्या पुण्यतिथी निमित्त पाठक ट्रस्ट बाल अनाथाश्रमात भेटण्याचा योग आला. इथे आल्यानंतर खरोखरच ज्या बालकांना देवाने जन्म दिला, त्यांना पाळणारे म्हणजेच त्याचे संपूर्ण पालकत्व स्विकारणारे कोळसे पाटील सर व त्यांचा संपूर्ण स्टाफ हा खरोखरच सर्व मुलांचा पोटच्या मुलांपेक्षा जास्त काळजी घेऊन सांभाळ करतात. त्या सर्वांना परमेश्वर अशीच शक्ती व सद्‌बुध्दी देवो ही परमेश्वर चरणी नम्र विनंती.*

**– श्री. विजयसिंह ज. भोसले**

संचालक, कै. मोहनराव शिंदे सह.सा.कारखाना लि., आरग.



शरद उपाध्ये

## सुप्रसिध्द 'राशीचक्र'कार **श्री. शरद उपाध्ये** यांनी दि. ८/११/२०१३ रोजी संस्थेस भेट दिली असता दिलेला अभिप्राय

८/११/२०१३

*श्री पाठक ट्रस्टच्या पाठक अनाथाश्रमाला भेट देण्याचा योग आज आला. आश्रमातील स्वच्छता, शांतता, शिस्त, वात्सल्य व बाळांची काळजी घेणारा सेवकवर्ग पाहून मन भरून आले. स्वतःची प्रॅक्टीस सांभाळून समाजासाठी एवढे मोठे योगदान देणारे डॉ. पाठक साहेब ऋषीतुल्य आहेत. दत्तमहाराज त्यांच्या कार्याला उदंड यश देवोत ही प्रार्थना.*

**– श्री. शरद उपाध्ये**
'राशीचक्र'कार.

या प्रसंगी **श्री. शरद उपाध्ये** यांनी संस्थेस बहुमोल अशी **रु. ७५,000/–** ची देणगी दिली तसेच विविध धान्यही दिले.

*मन:पूर्वक धन्यवाद !*

## आमच्या मते...

दि. २२/१२/२०११

डॉ. पाठकांचे हे वृध्दाश्रम नसून ते एक 'वट–वृक्षाचे' झाड आहे. वृक्षाखाली ज्याप्रमाणे दमलेली, थकलेली, म्हातारी, निराधार जनावरे सावलीसाठी येऊन बसतात व विश्रांती घेतात, त्याचप्रमाणे जीवनाच्या शेवटच्या टप्प्यात आलेले म्हातारे–कोतारे, निराश्रित माणसे, आम्ही सर्व माणसे येथे आहोत. येथे आमचे म्हातारे शरीर व मन परत तारुण्य उपभोगत आहोत.

येथील सर्व नोकर लोक आमची आपलेप्रमाणे काळजी घेतात. भोजनाची चव विशेष आहे. हा वृध्दाश्रम नसून 'आनंदाश्रम' वाटतो.

पूजनीय डॉ. पाठक यांना दीर्घायुष्य लाभो हीच गणरायाच्या चरणी विनंती.

आपला सर्वांचा सहकारी व आश्रमवासी,

**– श्री. वसंतकाका जोशी.**

दि. २२/१२/२०११

ज्याप्रमाणे चंद्राचा प्रकाश कलेकलेने वाढत जातो त्याप्रमाणे आजपर्यंत कार्य करून एक एक पायरी चढला आणि प्रकाशला त्याप्रमाणे आपली कीर्ती आणि सन्मान वाढत राहो.

हिमशिखराप्रमाणे उत्तुंग व्हा व त्याच हिमालयासारखी धवल कीर्ती लाभो. हिमालयाचा एक भाग कैलास आहे आणि त्यावर शिव–पार्वती वास करतात आणि त्या दोघांचे कार्य समान होते. पार्वती ही शक्ती होती म्हणून शिवाने तिला आपल्या बरोबरीचे अविभाज्य स्थान दिले. त्यावेळी नारद तेथे होते. त्यांनी दोघांची स्तुती करून तुम्ही दोघेही 'अर्धनारीनटेश्वर आहात' अशी उपमा दिली.

त्याचप्रमाणे डॉ. पाठक व डॉ. सौ. अंजली पाठक या दोघांनी आजपर्यंत केलेले वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील काम पाहिले तर आज मी आपणा दोघांना 'अर्धनारी नटेश्वर' म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही, ही माझी धारणा आहे.

परमेश्वराजवळ ही प्रार्थना आहे, आपणाला हिमशिखरासारखी धवल कीर्ती प्राप्त होवो व आपण दोघेही अर्धनारीनटेश्वरासारखे कार्यरत रहा.

**– श्रीमती कोकीळ आजी**

### पाठक वृध्दाश्रमातर्फे डॉ. मुकुंदराव पाठक यांच्या सत्कारप्रसंगी श्रीमती कृष्णाबाई शिंदे यांनी व्यक्त केलेले मनोगत...

डॉ. मुकुंदराव पाठक यांनी नॅब तर्फे अंधशाळेत केलेले कार्य, अंध कल्याण कार्यशाखेचे जिल्हा अध्यक्ष पदावरून केलेले कार्य, अंधांना शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, अंधत्व निर्मूलन व नियंत्रण या करिता भरीव कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाने त्यांना सन २०१२ मध्ये पुरस्कार देऊन सन्मानित केले. डॉ. पाठक यांनी अंधांकरिता कार्य केले, तसेच अनाथ बालक आश्रम व निराधार वृध्दांचे करिता मिरज येथे वृध्दाश्रम ही संस्थापण काढली आहे. त्या संस्थेचे ते पालक आहेत. स्वतःची मुले किंवा

नातेवाईक काळजी घेणार नाहीत पण डॉक्टरांनी त्यांना मुलांची माया देऊन त्यांच्या प्रकृतीची व जेवणखाणेची व औषधोपचाराचीही सोय करून त्यांना प्रेमाचा व जिव्हाळ्याचा आधार दिला आहे.

म्हणून आम्ही आश्रमातील सर्व वृध्द मंडळी त्यांना आशीर्वाद व त्यांचे कार्याचे कौतुक व अभिनंदन करत आहोत, त्यांना हे सामाजिक कार्य करणेस आरोग्य व दीर्घायुष्य लाभो व अशीच सेवा त्यांच्या हातून घडो हीच प्रार्थना ईश्वराजवळ करीत आहोत.

**डॉ. आर. एन. पाठक यांच्या पाठक वृध्दाश्रमात झालेल्या सत्कारात**
**श्री. सुधीर आत्माराम दिवाण यांनी व्यक्त केलेले मनोगत**

डॉक्टर मुकुंदराव पाठकांना या वर्षी सलग दोन पुरस्कार मिळाले.

